पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,
आकुर्डी, पुणे -44,
PCNTDA
दुरध्वनी क्र. 020-27652934 / 27652935, फॅक्स : 27353670

क्र. विप्रा/गृहयोजना/ 227 दिनांक :- 21/5/21

## निवेदन

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणामार्फत सेक्टर १२ येथे विकसित करण्यात येत असलेल्या गृहप्रकल्पातील LIG व EWS प्रकारातील सदनिकांसाठी लाभार्थी निश्चित करण्याकरिता प्राप्त Online अर्जांची सोडत आज दि. २१/०५/२०२१ रोजी सकळी ८.३० वाजता मा. ना. श्री. अजितदादा पवार, मा. उप मुख्यमंत्री तथा मा. पालकमंत्री, पुणे यांच्या हस्ते काढण्यात आली. सदर सोडतीमध्ये प्रत्येक प्रवर्गासाठी निवडयादी व प्रतिक्षायादी तयार करण्यात आली. सदर यादी सोडतीच्या वेळी स्क्रीनवर दाखविण्यात आली तसेच ही यादी प्राधिकरण कार्यालयाच्या www.pcntda.org.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

निवड यादीतील लाभार्थ्यांना लवकरच तात्पुरते वाटपपत्र पाठविण्यात येईल. सदर लाभार्थ्यांना उत्पन्नाचा दाखला व इतर कागदपत्रे संबधित कार्यालयाकडुन उपलब्ध करून घेण्याकरिता १ महिन्याची (१ जुन ते ३० जुन २०२१) मुदत देण्यात येत असून १ जुलैनंतर माहितीपुस्तकामध्ये नमुद केल्यानुसार निवड यादीतील लाभार्थ्यांच्या आवश्यक कागदपत्रांची तपासणी करण्यात येईल. तपासणीसाठी वेळ व दिनांक अर्जदारास कळविण्यात येईल. लाभार्थ्यांनी पहिल्या हप्त्याची १०% रक्कम ३०/०६/२०२१ पूर्वी जमा करून कागदपत्रे तपासणीवेळी त्याबाबतची पावती सादर करणे आवश्यक आहे, याबाबत सविस्तर सुचना तात्पुरते वाटपपत्रामध्ये देण्यात येतील.

सोडतीमध्ये अयशस्वी ठरलेल्या तसेच प्रतिक्षायादीतील अर्जदारांची अनामत रक्कम रू. ५०००/- (EWS) व १००००/-(LIG) १५ दिवसामध्ये परत करण्यात येईल.

निवड यादीतील लाभार्थी कागदपत्रे तपासणी वेळी अपात्र ठरल्यास, मुदतीमध्ये कळविलेली रक्कम न भरल्यास अशा लाभार्थ्यांचे वाटप रद्द करून प्रतिक्षा यादीतील अर्जदारांना कागदपत्रे तपासणी व रक्कम भरण्याबाबत कळविण्यात येईल.

(बन्सी गवळी)
मुख्य कार्यकारी अधिकारी

Scanned with CamScanner